**RNI No. MAHBIL /2009/35530**

**Reg. No. MH/MR/South-341/2011-13**

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक १७ (६)] बुधवार, ऑगस्ट २१, २०१३/श्रावण ३०, शके १९३५ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ३८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.**—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

दिनांक २० ऑगस्ट २०१३ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक २१ ऑगस्ट २०१३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९७७ चा महा. १. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारताच्या गणराज्याच्या चौसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन (सुधारणा) अधिनियम, २०१३ असे संक्षिप्त नाव म्हणावे.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये, पोट-कलम (१) मध्ये :— १९७७ चा महा. १.

(अ) "रुपये पंचवीस हजार" या मजकुराऐवजी "रुपये चाळीस हजार" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) पहिल्या परंतुकामध्ये, "रुपये एक हजार" या मजकुराऐवजी "रुपये दोन हजार" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४अ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ४अ मधील पोट-कलम (२ड) मध्ये, "दिनांक १ मे २०११ पासून दरमहा पंचवीस हजार रुपये" या मजकुराऐवजी "दिनांक १ ऑगस्ट २०१३ पासून दरमहा चाळीस हजार रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.